International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 12 No.2 Nov-Dec 2024

# अहमदनगर जिल्ह्याचा कधीही न विसरता येणारा दैदिप्यमान इतिहास व अहिल्यानगरचा उदय आणि अपेक्षा

**डॉ. विजय संतू पाटोळे**
सहाय्यक प्राध्यापक, रयत शिक्षण संस्थेचे,
स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर जि. अहिल्यानगर
**Corresponding Author: डॉ. विजय संतू पाटोळे**
**Email:** vijay.patole9@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.14551464**

**सारांश:**

मनुष्याचे अस्तित्व हे फक्त इतिहासामुळे आहे, आपण जेवढे मागे बघाल तेवढे आपण पुढे जाणार. इतिहासाशिवाय मनुष्याला भविष्य नाही. अनुभव हा जरी सर्वश्रेष्ठ शिक्षक आहे असे म्हटले जाते परंतु इतिहास हाच सर्वोत्तम शिक्षक आहे असे म्हणावे लागणार. आपल्या महाराष्ट्र राज्याला इतर राज्याप्रमाणे भूगोल तर आहेच परंतु सर्वात मोठा इतिहास आहे तो मोठा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा आहे.आज भारतातील विविध शहरे यांचे नामांतर झाले आहे आणि भविष्यात होत राहतील यात शंका नाही. महाराष्ट्र हा पुरोगामी विचार असलेले राज्य आहे आणि इतिहास निर्माण करणारे राज्य आहे या महाराष्ट्रात अनेक जिल्ह्याचे नामांतर झालेले दिसून येते त्यापैकी एक म्हणजे अहमदनगर ज्याचे नामांतर अहिल्यानगर असे करण्यात आले आहे. नाव बदल्यामुळे प्रगती होईल का? नाव बदल्यामुळे इतिहास विसरला जाईल का? आपण भारतीय आहोत आणि आपण इतिहास कधीही विसरता काम नये. अहमदनगर चा इतिहास फार जुना आहे आणि अभिमान वाटणारा असा आहे तरी सुद्धा नव्याने नामांतर झालेल्या जिल्ह्याकडून भविष्यात काय अपेक्षित आहे हे पहावे लागेल. ऐतिहासिक शहराचा ऐतिहासिक प्रवास यात वर्णन केला आहे.

**सूचक शब्द**: अहमदनगर, अहिल्यानगर, निजामशाही, शिवरायाचे वंशज, राजकीय वाटचाल

**ऐतिहासिक पार्श्वभूमी:**

अहमदनगरचा इतिहास तसा ख्रि.पू. २४० वर्षांपासून सुरु होतो. सम्राट अशोकाच्या काळातही याचा उल्लेख आढळून आला आहे. त्याकाळात याला छोटे छोटे पाडे म्हणूनही उल्लेख आहे. जुन्नर ते पैठण या दोन क्षेत्राला जोडणारी एक जागा म्हणूनही उल्लेख आढळून येत आहे. ख्रि.पू. ९० ते ३०० दरम्यान अंध्राबित्यास वंशांच्या राजांनी दक्षिण भागावर राज्य केले. नंतर राष्ट्रकुट वंशांनी अहमदनगरवर ४०० वर्षांपर्यंत राज्य केले. पुन्हा नंतर ६७० ते ९७३ पर्यंत राष्ट्रकुट राजांनी राज्य केले. गोविंद ३ रा (७८५ ते ८१० ) हा राष्ट्रा कुटातील सर्वात पराक्रमी राजा मानला जात होता. त्याने नंतर आपल्या साम्राज्यांचा विस्तार दक्षिणेतील तुंगभद्रा नदीच्या उत्तरेला असणारे मारवाड व राजपुतना या दोहो पर्यंत केला. नंतर चालुक्य वंशाने ९७३ ते ११९० पर्यंत राज्य केले. अकोले तालुक्यातील हरिश्चंद्र गडावरील मंदिरे व लेण्या याच काळात कोरल्या गेल्या.

चालुक्यानंतर देवगिरी यादवांनी सन ११७० ते १३१० पर्यंत अहमदनगर राज्य केले. देवगिरी (आताचा दौलताबाद) हे अहमदनगरच्या ईशान्येला ७४ मैल अंतरावरचे ठिकाण हे त्यांची राजधानी म्हणून ओळखली जायची. त्यांचा एक मुत्सद्दी व मंत्री असणारा हेमाद्री याने मोडी लिपीचा शोध लावला. हेमाद्रीने पुढे आपल्या प्रतिभेचा उपयोग चुनखडी व गुळ विरहीत बांधकाम करण्यासाठी करून घेतला, दगडावर दगड ठेवून , विशिष्ट कोनांवर आधारित बांधकाम त्याने केले आणि जिल्ह्यात असे २६ प्रकारच्या मंदिरांचे बांधकाम चुनखडकाशिवाय केलेले

आढळून येते. त्याची बांधकाम शैली ही आजही अभियांत्रिकी पुढे आव्हान आहे.

रामदेवराय हा एक प्रसिद्ध यादव राजा होता, त्याचा उल्लेख संत ज्ञानेश्वर यांनी आपल्या 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथातही केलेला आढळून येतो. हेमाद्री हा यांच्याच काळातील प्रसिद्ध असा मंत्री होता. १२९४ ला दिल्लीच्या राजा जैलालनुद्दिन सेनापती अल्लाउद्दीन खिलजी याने यांच्या सैन्यांच्या सतर्क न राहिल्याचा फायदा घेऊन यादवांचा पराभव केला. विंध्य पर्वतापलीकडे होणारा हा पहिला मुसलमानांकडून झालेला प्रभाव व घुसखोरी व पाडाव होता. या सारखा विजय मुघल सम्राटांना दक्षिणेत पाय रोखण्यासाठी प्रेरणादायी असा राहिला. सततच्या होणाऱ्या आक्रमणामुळे येथील साम्राज्य १३१८ ला संपुष्टात आले. महाराष्ट्रातील सर्व कारभार दिल्ली स्थित लोकांकडून होणे सुरु झाले. सन १३१८ साली मुहम्मद तुघलक या सम्राटाने दिल्लीची राजधानी देवगिरी येथे स्थलांतरित केली व देवगिरीला दौलताबाद हे नाव दिले गेले. नंतर मुहम्मद तुघलक दिल्लीला परतला व त्याच्या काही लोकांनी येथे रयतेची लूट व लोकांची घरे जाळून टाकली. अशामुळे मुस्लीम नेते व इतर यांच्यात संघर्ष निर्माण झाला, यात अल्लाद्दिन हसन गंगु या अफगाणी सैनिकाने मुघल सत्ता उलटवून लावली व एक स्वतंत्र साम्राज्य निर्माण केले आणि १३४७ ला गुलबर्ग्यात गंगू बहामनी असे नाव देण्यात आले. नंतर त्याचे साम्राज्य बहामनी साम्राज्य म्हणून ओळखण्यात येऊ लागले, हे साम्राज्य जवळ जवळ १५० वर्षे टिकले १३ जणांनी गंगू हसन नंतर राज्य केले. प्रशासन व रचना बाबत बहामनी साम्राज्य सशक्त होते, मात्र १४३३ नंतर मुत्सद्दी लोक बलवान झाले व अप्रामाणिकपणा वाढीस लागला आणि प्रधान म्हणून मोहमद गवान याने प्रशासनात मोठ्या प्रमाणात बदल करण्याचे ठरविल्याने मुत्सद्दी नेते कुटीलतेने त्याच्या विरुद्ध आरोप करू लागले आणि साम्राज्याचा अस्त होऊ लागला आणि १४८७ ला मोहमद गवान चा मृत्यू झाला.

पुढे बहामनी साम्राज्याचे पाच वेगवेगळया साम्राज्यात विभाजन केले गेले. अहमदनगर हे त्यापैकी एक जे निजामशाहीच्या नावाने ओळखले जाते. मोहमद गवान हा यशस्वी राहिला तो मंत्री निजाम उल मुल्क भैरी यामुळे आणि १४८५ पर्यंत भिर व अहमदनगर त्याच्या राज्याला जोडण्यात आले. या क्षेत्राचे व्यवस्थापन मंत्र्यांच्या मुलगा मलिक अहमद याकडे सोपविण्यात आले जो निजाम शाही वंशाचा संस्थापक झाला, त्याने आपले मुख्यालय पुणे जिल्ह्यातील जुन्नर येते बनविले.

सन १४८६ ला निजाम –उल- मल्क ची हत्या करण्यात आली आणि मलिक अहमद हा बहामनी साम्राज्याचा प्रधान झाला. मलिक अहमद हा राजापासून दूर होता, राजाने त्याच्या एक सेनापतीला जहांगीर खानला मलिक खान विरुद्ध चाल करून जायला सांगितले. २८ मे १४९० ला जहागीर खान चढाई करून आला मात्र मलिक खान कडे अल्प सैनिक व बेसावधपणा असूनही त्याने स्वत:च्या धैर्याने जहांगीर खानचा पराभव केला. ज्या ठिकाणी लढाई झाली त्या जागेत बाग होता निजामाने तो राजमहालासमोर तयार केला होता. नंतर त्याने दौलताबाद वर सतत हल्ले केले, त्याचे मुख्यालय जुन्नर हे दौलताबाद पासून फार अंतरावर होते म्हणून त्याने १४९४ ला निजाम बागेजवळ एक शहर की जे सीना नदीच्या डाव्या बाजूला वसविले आणि त्याचे नाव त्याने अहमदनगर असे ठेवले. दोन वर्षातच त्याने बगदाद व कैरोचे वैभवास तोडीस तोड बनविले.अहमदशहा, बुरहान शहा, सुलताना चांदबीबी यांची कारकीर्द असणारी निजामशाही येथे १६३६ पर्यंत टिकली.

अहमद निजाम हा स्वस्थ नव्हता तर बहामनी सैन्याचा त्याला बदला घ्यायचा होता. १४९९ साली तो यासाठी यशस्वी झाला , त्याने दौलताबाद किल्ला जिंकला आणि त्याचे सैन्य त्याने तेथे रवाना केले. या विषयाचे द्योतक म्हणून त्याने बाग निजाम भोवती भिंती बांधल्या आणि त्यात लाल दगडांनी एक महाल बांधला. (आजचा अहमदनगर किल्ला) अहमद निजान सन १५०८ ला मरण पावला, नंतर त्याच्या सात वर्ष वयाच्या बुरहान या मुलाकडे सत्ता गेली . अहमद निजाम हा खरोखर एक उत्तम व्यक्ती होता, त्याच्या अंगभूत वैशिष्ट्यानमुळेच त्याने स्वतंत्र साम्राज्य निर्माण केले. त्याची दया, सद्वर्तन, आणि कार्यक्षमता यामुळे त्याने सर्व लोकांशी व परकीय राजांशी सूत जुळविले होते . गरीब शेतकरी व योद्धे यांच्याशीही त्याने उत्तम संबंध जोपासले होते . जरी त्याचे मूळ हिंदू होते तरीही त्याने बहामनीचा विश्वास संपादन केला होता. तो एक चांगला तलवार बाज , प्रशासक व सेनापती होता.

**बुरहाननिजामशाह (१५५०८ ते १५५३):**

एक सात वर्षाचा बालक असल्याने मुक्मील खान दखनी या मुत्सद्दीची नेमणूक राजाचा संरक्षक म्हणून करण्यात आली. ज्यावेळी राजा एक तरुण झाला त्यावेळी त्याने एक नर्तकीसी लग्न केले. अम्मा असे तिचे नाव व दारूही पिऊ लागला. मुक्मील खान ला हे कधीही आवडले नाही आणि त्याने निवृत्ती घेतली.

सन १५२३ ला विजापूरच्या इस्माईल आदिल शाहची बहिणीबरोबर बीवी मेरियम हिच्याशी विवाह झाला. मोठ्या थाटात विवाह समारंभ पार पडला. अशद खान हे बेळगावचा की जो आदिलशहाचा दूत होता त्याने बुरहान ला हुंड्याच्या रुपात सोलापूर देऊ केले, त्याने नकार दिला व त्यांच्यात वितुष्ट निर्माण झाले. बुरहान हा करारी होता आणि चांगला योदधा असल्याने तो सतत खानदेश व बेरर राज्यांशी लढत असे. तो महान पराक्रमी बहादुर शहाला गुजरातच्या राजाला कधीही घाबरत नसे. तो एकदा बुरहान वर चढाई करण्यासाठी आला काही महिने अहमदनगर किल्ल्यात राहिला, गुंड शाहिला तो कधीही घाबरला नाही. बहादुरशहा परतला . बुरहान हा उत्तम प्रगल्भेताचा व्यक्ती होता., त्याला बहादुर शहाचा पराक्रम, मूल्य , महानता माहित होती. बुरहान ने त्याचा एक संत शाह ताहीरला गुजरातला पाठविले , बहादूर शहा बरोबर मैत्रीचे संबंध बनविले, त्याचे विजयनगर, राजराज, अशा हिंदू राजा बरोबरही मैत्रीचे संबंध होते. ४७ वर्षाच्या राज्यानंतर तो वयाच्या ५४ व्या वर्षी मृत पावला . त्याचे मृत शरीर पर्शिया येथील कार्बेला येथे दफन करण्यात आले. जी जेथे मुहमद हुसेन या देव् पुत्राला पुरण्यात आले होते, बुरहान ला दोन मुलगे होते, हुसेन व अब्दुल कादिर हे त्याच्या लाडकी बायको अमिना पासून झाले होते आणि बीवी मेरीयम पासून शाह अली , व मिरान मुहमद बुकार हे दोन मुले होती.

**हुसेन निजाम शाह (१५५३-१५६५)**

हुसेनचे वडील १३ वर्षांचा असताना वारले. त्यावेळी दोन पक्ष होते. एक हुसेन निजाम याला मानणारे होते तर त्याचा भाऊ अब्दुल कादरला मानणारे होते. दक्षिणेचे दोन्हीही मुस्लीम व हिंदू होते. त्याला त्याच्या पक्षातून हाकलून देण्यात आले. आणि त्याने अहमदनगर सोडलेव बिररच्या राजाचा आश्रय घेतला. दुसरा भाऊ विजापूरच्या काकांकडे निघून गेला. हुसेन निजाम शाह ने अहमदनगर किल्ला दगडांनी बांधला, किल्ला सुरुवातीला चिखलाने बांधला होता, नंतर किल्ला शत्रूपासून दूर राहावा म्हणून किल्ल्याभोवती खोल खंदक खोदले . विजयनगरचा हिंदू राजा रामराजाने अहमदनगरवर अनेकदा हल्ला केला आणि हुसेनला जुन्नरला जाण्यास भाग पाडले. विजापूरच्या आदिलशाहने अनेकदा रामराजाला हुसेन विरुद्ध आक्रमण करण्यास मदत केली. आणि राम राजाने या दोघात लढाई होण्यास चिथावणी केली, याची निरर्थकता लक्षात घेवून त्याने विजापूर , बिदर , व गोलकोंडा या राजांशी हातमिळवणी केली व १५६४ ला रामराजा विरुद्ध उभा राहिला. १५६५ ला सर्वांच्या सैन्याने रामराजाचा दारून पराभव केला. हत्तीच्या सोंडेत रामराजाला उचलून आणले . या सर्वांच्या सैन्याने विजयनगर लुटले व वैभव लुटून हुसेन अहमदनगरला मृत्यू पावला , त्याला चार मुले व चार मुली होत्या.

**मुर्तजा निजाम शाह (१५६५ -१५८८)**

हुसेनचा मुलगा त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या राजगादीवर आला. त्याला लोक दिवाना म्हणजे वेडा म्हणून ओळखायचे. त्याच्या आई कुरजा सुलताना हिने त्याच्या पश्चात सहा वर्षे राज्यकारभार चालविला. विजयनगरच्या राजामुळे निजाम शाह व आदिलशहा यांच्यात मतभेद निर्माण झाले. परंतु पुन्हा दोघांनी बिररचा प्रधान तुफल खान याच्या विरोधात चढाई केली. आक्रमणाहून परतल्यानंतर आदिलशाहने मुर्तजा निजामशाह ला पकडण्याचा प्रयत्न केला मात्र त्याला पकडण्या पूर्वीच तो रात्री आईबरोबर पलायन केले. नंतर त्याने आईच्या ऐवजी चंगीजखान याला नियुक्त केले. नंतर मुर्तजा व चंगीझ खानने तुफल खानवर स्वारी केली . तुफल खानाला अपमानित झाल्यासारखे वाटले आणि त्याने दिल्लीचा सम्राट अकबराकडे मदतीसाठी याचना केली. अकबराने मुर्तजाला बीरर सोडण्यास सांगितले मात्र त्याने दुर्लक्ष केले. नंतरच्या काळात चंगीझ खानवर तो नाराज झाला व त्याला विषारी पेला पिण्यास भाग पाडले. सलाबत खानाला नंतर मुर्तजा ने नियुक्त केले.(१५७९). १५८४ ला विजापूरच्या राजाच्या बहिणीला अहमदनगरला मोठ्या थाटामाटात आणले गेले ते मिरान हुसेन , अहमदनगरच्या राजपुत्राशी विवाह करण्याच्या हेतूने. मुर्तजा हा आपल्या विचित्र वागण्यामुळे प्रसिद्ध होता, कारण त्याने दोन सुंदर हार त्याच्या आवडत्याना देऊ केले, मात्र सलाबत खानला हे आवडले

नाही त्याने त्या हारांच्या जागी दुसरे दिले, राजाला समजल्यानंतर त्याने सलाबतखानला विजयनगर हून लुटलेला सोने दागदागिने जाळात टाकायला सांगितले कारण ते दोन हार कुठे लपविलेले आहेत याचा शोध घेण्यासाठी सर्व दागिने जाळले जातात. सलाबात खानने विश्वास घात केला म्हणून त्याला दंदा राजापूरच्या कारागृहात टाकतात. आपल्या मुलावरही त्याने संशय घेतला की तो याला कुठेतरी ठेवेल. म्हणून तो मीरान च्या बेडरूम मध्ये चारही बाजूला आग लावतो, मारण्याचा प्रयत्न करतो, परंतु मीरान त्याच्या वडिलांचे मित्र फतेह शाह याला ओरडून मदत मागतो , तो त्याला वाचवितो व त्याला गुपचूप पणे दौलताबादला पाठवितो, याची खबर मुर्तजा याला लागताच त्याने सर्व मंत्रिमंडळ बरखास्त केले व मिर्जा खानला नियुक्त केले . मिर्जा खानला राजाचा मुर्खपणा माहीत होता , यावेळी त्याने सलाबात खानला सोडले. मिर्जा खानने त्याच्या राजाच्या मुलाला मिरानला दौअलाबाद हून सोडले व अहमदनगरला घेऊन आला. राजपुत्र व मिर्जा खान ४० हजार सैनिक घेवून किल्ल्यात घुसले, राजपुत्राने आपल्या वडिलांना वाईटाने छळविले व गरम कक्षात ठेवले, दरवाजे बंद केले आणि जाळ केला, धुराने गुदमरल्याने मुर्तजा १५८८ ला मृत पावला.

**मिरान हुसेन (१५८८)**

मिरान हुसेन याने मिर्झा खानला प्रधान म्हणून नियुक्त केले मात्र कशाचीही परवा ना करता ऐशोआरामाला महत्व दिले. मिर्झा खानने त्याला सल्ला दिला की, राज कुटुंबातील सर्व पुरुषांना मारून टाका, नाहीतर ते संशयाला बळी पडून सर्व अधिकाऱ्यांना धोका निर्माण होईल म्हणून मिरान ने त्याच्या सांगण्यावरून १५ राजपुत्रांना मारून टाकले. मिरान हुसेन ने मिर्झा हुसेनला मारून टाकण्याचे ठरविले. मिर्झा हुसेनला हे समजल्यावर त्याने राजाला पकडले व चुलतभाऊ इब्राहीम व इस्माईलला पुण्याहून पाठविले.तो पुण्याहून आल्यानंतर मिर्झा खानने एक सभा बोलावली व इस्माईल शाह हा बारा वर्षांचा मुलाला निजाम शाह बनविले गेले. नवीन राजाचे स्वागत चालू असताना सैनिक सेनापती जमाल खान हा अनेक अधिकारी व सैन्याला घेऊन किल्ल्याबाहेर मिरान ला पाहण्यासाठी थांबला होता. तो म्हणाला जर मिर्झा खानच्या अनियंत्रित हालचालींना आवर न घातली तर सर्व गुलाम होतील. मिर्झा खानने बाहेर जेंव्हा एवढी गर्दी पाहिली तेंव्हा त्याने मिरान हुसेन चे शिरच्छेद करायला सांगितले. त्याने त्याचे मुंडके खांबावर टांगून ठेवले. जमाल खान ने किल्ल्याचे प्रवेशद्वार जाळून टाकण्याचा आदेश दिला, नंतर सर्व किल्ल्यात शिरले, मिर्झा खान पळून जाण्यात यशस्वी ठरला, मात्र त्याला जुन्नर जवळ पकडले व पुन्हा अहमदनगरला आणले, त्याची संपूर्ण शहरात गाढवावरून धिंड काढली , कत्तली सुरु झाल्या व सात दिवसात हजारो परकीय मारले गेले.

**इस्माईल निजाम शाह : (१५८८ ते १५९०)**

जमाल खान याने इस्माईल ला शाह असा दर्जा दिला. जमाल खानने सर्व परकीय मुस्लिमांना देहदंड दिला, त्याच्या जीवनाचा बराचसा भाग हा लढाई करण्यात गेला. दक्षिणेत व्याकुळता निर्माण झाल्यावर अकबरला माहित झाल्यावर त्याला बुरहान निजामची आठवण झाली आणि त्याने जमाल खानला स्वारी करण्यास सांगितले , एका लढाईत जमाल खान मारला गेला. बुरहान निजाम ने त्याच्या मुलाला पकडले व तुरुंगात टाकले.

**बुरहान निजाम शाह (दुसरे) १५९० ते १५९४)**

बुरहान निजाम दुसरा याने ही ऐशोआरामात जीवन जगण्याचे ठरविले. त्याच्या काळात विशेष काही घडले नाही . मार्च १५, १५९४ पूर्वी त्याने आपल्या मृत्युपूर्वी , त्याचा उत्तराधिकारी म्हणून इब्राहिमला निवडले

**.इब्राहीम निजामशाह (१५९४):**

आपल्या वडिलांच्या सल्ल्याप्रमाणे इस्माईल निजाम याने मियान मंजू दाखिनी यांना आपला शिक्षक म्हणून नेमले व प्रधान म्हणून दोन पक्षाकडे लक्ष देण्यास सांगितले. एक मियान मंजू तर दुसरी इक्लास खान नेतृत्व कर्तव्य होता. आदिल शाहला नेहमी अहमदनगर जिंकायचे असे वाटायचे म्हणून तो अहमदनगरच्या दिशेने कुच करू लागला इख्लास खान याला युद्ध करू वाटायचे मात्र मिरान मंजूने शांतीचा मार्ग स्वीकारून सर्व सैनिकांनी सम्राट अकबराला जून मिळावे.

**अहमद दुसरा (१४९४ ते १४९५)**

मराठ्यांचे राजे शिवाजी राजा यांनीही अहमदनगरवर हल्ला केला, मुघलांसाठी शिवाजींची फार मोठी दहशत होती . शिवाजी महाराजांकडे सैन्य कमी असूनही गनिमी काव्याने युद्ध लढण्याची युक्ती होती. त्यांनी मुघल सैनिकांना सळो की पळो केले. शहाजहान यांनी औरंगजेब याची १६३६ ला व्हाईसराय म्हणून नियुक्ती केली. १६५७ आणि १६६५ साली शिवाजी महाराजांनी

अहमदनगरवर दोनदा स्वारी केली . औरंगजेब मराठी साम्राज्याचा अंत करू पाहत होता परंतु त्याला ते शक्य झाले नाही आणि तो २१ फेब्रुवारीला १७०७ ला अहमदनगर येथे मरण पावला.

पुढे भविष्यात १७६० ला निजामाचा पेशव्यांकडून पराभव झाला आणि १७९५ ला खर्डा येथे मराठ्यांनी निजामाचा पाडाव केला. सवाई माधव राव पेशवा यांचे १७९५ ला निधन झाल्याने मराठ्यात गटबाजी झाली . दौलतराव शिंदे यांनी १७९७ ला बाजीराव पेशवा यांच्याकडून अहमदनगर किल्ला ताब्यात मिळविला. नाना फडणवीस् यांनी शिंदे यांना अहमदनगरच्या तुरुंगात डांबले. यशवंतराव होळकर आणि दौलतराव शिंदे यांनी बाजीराव पेशव्यांचा छळ केला आणि त्याला ब्रिटीशांशी तह करावा लागला. जनरल वेलस्लीने अहमदनगर वर हल्ला करून ताबा मिळविला व १८०३ ला वेलस्लीने पेशव्याला किल्ला परत दिला. बाजीराव पेशवे पुण्याला गेल्यावर त्याने अहमदनगर किल्ला ब्रिटिशांच्या ताब्यात दिला.

**ब्रिटीश साम्राज्य: (१८१७ ते १९४७)**

ब्रिटीश सरकारने अहमदनगर किल्ल्यावर ताबा मिळविल्यानंतर सर्व वैभव लयास पावले होते. दुष्काळाने व ब्रिटीश सैनिक व स्वातंत्र्य सैनिक यांच्यातील सततच्या युद्धामुळे लोकसंख्या विरळ झाली होती. आणि बरेचसे लोक पारनेर, जामगाव , अकोला येथील खेड्यात राहू लागले. अनेक कोळी व भिल्लांनी ब्रिटीश सैन्यातील तुकड्यांना त्रास दिला. राहुजी भांगरे यांनी मोठ्या प्रमाणात उठाव केला. १८५७ च्या उठावाचा परिणाम अहमदनगर वरही जाणवला. भागोजी नाईक यांच्या नेतृत्वाखाली जवळ जवळ ७००० सैनिक होते. पारनेर, जामगाव, राहुरी , कोपरगाव , नाशिक अशा भागातून ते ब्रिटीशांविरुद्ध लढत होते. परंतु १८८० पर्यंत सर्वकाही थंडावले आणि खऱ्या अर्थाने गुलामगिरी ची सुरुवात झाली.

लोकमान्य टिळक यांनी राजकीय चळवळ संबंध भारतात चालविली, ब्रिटिशांनी त्यानाही तुरुंगात टाकले. १९२० साली त्यांचे निधन झाल्यावर महात्मा गांधी यांनी नेतृत्व स्वीकारून ब्रिटिशांविरुद्ध असहकार चळवळ स्वीकारली. हजारो लोकांनी सत्याग्रह केला आणि स्वत: ला अटक करून घेतले . १९२० ते १९४७ च्या दरम्यान अनेक सत्याग्रही चळवळी घडून आल्या. १९४२ ते १९४४ पर्यंत अनेक लढे पुकारण्यात आले. यामध्ये महात्मा गांधी, सरदार पटेल, राजेंद्र प्रसाद, मौलाना आझाद, सुभासचंद्र बोस, आय सर्वांना अटक करण्यात आली. गांधी व्यतिरिक्त सर्वांना अहमदनगरच्या किल्ल्यात ठेवण्यात आले आणि याच अहमदनगर किल्ल्यात पंडित जवाहरलाल यांनी 'डिस्कवरी ऑफ इंडिया' हा महान ग्रंथ लिहिला.

संत ज्ञानेश्वर यांनी अहमदनगर जवळील नेवासा येथे ज्ञानेश्वरी लिहिली, महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर स्वामी यांची सर्वात जास्त चरणाकीत स्थाने नगरमध्येच आहेत. शिर्डी ही संत साईबाबांची कर्मभूमी आहे. आचार्य आनंदऋषीजी महाराज, अवतार मेहेबाबा, दासगणू महाराज, सदाशिव अमरापूरकर, प्रसिध्द हिंदी मराठी सिने अभिनेते रावसाहेब पटवर्धन, थोर स्वातंत्र्यसेनानी अच्युतराव पटवर्धन, थोर स्वातंत्र्य सेनानी बाळासाहेब भारदे, भाई सथ्था , कम्युनिस्ट नेते दादा चौधरी , संसदपटू मधू दंडवते, कवी वामन (रेव्हरंड) टिळक, लक्ष्मीबाई टिळक, अण्णा हजारे, पोपटराव पवार असे नावाजलेले व्यक्तिमत्व आहेत. १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला .१५ ऑगस्ट १९४७ रोजी सकाळी ८ वाजता अहमदनगर किल्ल्यामध्ये आचार्य नरेंद्र देव यांच्या हस्ते तिरंगा फडकविण्यात आला.

अहमदनगर शहराला ऐतिहासिक अशी प्रभावशाली परंपरा राहिलेली आहे. अहमदनगर शहरात निजामशाही अस्तित्वात होती ती खालील स्मारके साक्षीला आहेत.

1. **अहमदनगर किल्ला:** अहमदनगर शहरातील सर्वात ऐतिहासिक स्मारक म्हणजे अहमदनगरचा किल्ला होय. सन १४९८ ला अहमद निजाम शाह याने जहांगीर खान यावर विजय मिळविला म्हणून त्याच्या स्मरणार्थ हा किल्ला बांधला. कालानुरूप वेगवेगळया राज्यकर्त्यांनी ह्या किल्ल्यावर ताबा मिळविला. सन १२ ऑगस्ट १८०३ रोजी जनरल वेलस्लीने याच्यावर ताबा मिळविला. १८०३ ते १८१७ दरम्यान अनेक मराठा तसेच १९४२ च्या 'छोडो भारत' आंदोलनातील अनेक भारतीय नेत्यांना या किल्ल्यात तुरुंगात डांबण्यात आले होते. जवाहर लाल नेहरू, सरदार पटेल, मौलाना आझाद हे १९४२ ते १९४४ पर्यत तुरुंगवासात होते. पंडित नेहरू यांनी याच किल्ल्यात 'डिस्कवरी ऑफ इंडिया' हा ग्रंथ लिहिला.

2. **बागरोजा:** या ठिकाणी राजा अहमद निजाम शाह यांची कबर असून याला पवित्र ठिकाणची बाग असे म्हटले गेले आहे . ही एक सुंदर अशी वास्तू असून या वास्तूवर पर्शियन वास्तुकलेचा प्रभाव आहे.
3. **फराह बाग :** शहरापासून ३ किमी अंतरावर नैऋत्य दिशेला हा महाल आहे. हा महाल नियामत खान आणि चिगीझ खान यांनी बुरहान निजाम शाह याच्यासाठी बांधला होता. बुरहान शहाला हा महाल आवडला नव्हता म्हणून १५८३ ला तो पुन्हा बांधला गेला. हा महाल अष्टकोनी आकाराचा असून वरती मजल्यांचे स्वरूप आहे. महालाच्या सभोवताली एक तळे होते जे आता कोरडे आहे . आज महाल जरी भग्नावस्थेत असला तरी आजही त्याच्या वास्तुकलेचा प्रभाव कमी झालेला नाही.
4. **भिस्तबाग :** शहरापासून ५ किमी अंतरावर असणारा, भिस्तबाग हे एक दुर्लक्षित ऐतिहासिक स्मारक आहे. महाल हा निजामशाहीच्या सुवर्ण काळातील एक वास्तू म्हणून स्मरण केले जाते. अष्टकोनी महाल हा सन १५०६ साली अहमद निजाम शाह यांनी बांधला. हा ही महाल त्याकाळी सुंदर अशा बागांनी आणि सभोवताली तळयाने वेढलेला होता.
5. **दमडी मस्जिद :** अहमदनगर किल्ल्याच्या उत्तरेला फक्त दगडाच्या सहाय्याने व उत्तम कोरीव कामाचा नमुना या स्मारकात पाहायला मिळतो. या मशिदीला दमडी मस्जिद असे का म्हटले जाते तर, त्याकाळात जे कामगार काम करीत होते त्यांना एक दिवसाची रोजंदारी एक दमडी या प्रमाणे रोज मिळायचा .ही मस्जिद १५६७ साली शाहीर् खान याने बांधली . सदर मस्जिद ही कलात्मक कमानी व सुंदर मीनारांमुळे आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरते आहे.
6. **सलाबत खानची कबर :** सलाबत खानच्या कबरीला लोक स्थानिक भाषेत 'चांद बीवी का महाल' असे या नावानेही ओळखले जाते. शहरापासून ८ किमी अंतरावर शहराच्या पूर्व दिशेला ही वास्तू आहे. खऱ्या अर्थाने ही दुसऱ्या सलाबत खानाची कबर आहे कि जो मुर्तजा निजाम शहाचा अतिशय प्रसिद्ध मंत्री गणला जात. त्याची कबर ही शाह डोंगरावर की जो समुद्र सपाटीपासून ३०८० फुटांवर आहे. ही अष्टकोनी इमारत असून तीन मजल्यांची इमारत आहे. यावरून नयनरम्य असे नगरचे दृश्य दिसते. अनेक मैलावरून या इमारतीचे दर्शन पर्यटकांना होते. या स्मारकाच्या बाजूला शाह शरीफ (दर्गा दायरा), मिरावली बाबा पहाड, कोठला मस्जिद , रमि खान कबर , कविजंग महाल, चीन्गीझ खान महाल, मंगनी महाल, मक्का मस्जिद, इ. प्रसिद्ध वास्तू आहेत.

अहमदनगरच्या जिल्ह्याच्या पश्चिम भागात सह्याद्री पर्वतांच्या रंग विखुरलेल्या असून कळसूबाई हे सर्वात उंच १६४८ मी. शिखर आहे. हरिश्चंद्रगड, रतनगड, यासारखे शिखरे ही अहमदनगर जिल्ह्यात आहेत. भीमा, घोड, सीना, प्रवरा, गोदावरी या नद्या असून सखल प्रदेशही अस्तित्वात आहेत. प्रवरा नदी कुलांग आणि रतनगड यामध्ये उगम पावते. तिची एकूण लांबी १२० मैल एवढी आहे. यावरच भंडारदरा धरण बांधले आहे. मुळा नदी हरिश्चंद्रगड व रतनगड यामध्ये उगम पावते. यावर मुळा धरण बांधण्यात आले आहे. सीना नदीच उगम जेऊर येथे होतो. अहमदनगर शहर हे सीना नदीच्या काठावर वसलेले आहे , पुढे ती सोलापूर जिल्ह्यात वाहते व भीमाला जावून मिळते. दख्खन चा पठार हा मुख्यत्वे वसलेला जिल्हा असून जमीन ही सुपीक प्रकारची आहे, या जिल्ह्यातील मृदेचे वर्गीकरण पाच प्रकारात केले जाते.

**अहमदनगर जिल्ह्याचे वैशिष्ट्ये**

1. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी आशिया खंडातील पहिला '**प्रवरा साखर कारखाना'** सन १९४८ ला सुरु केला. आज अहमदनगर जिल्ह्यात २५ पेक्षा जास्त सहकारी व खाजगी साखर कारखाने आहेत.
2. आदर्श खेडे '**राळेगणसिद्धी'** जलसंधारणासाठी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या पुढाकाराने राळेगण सिद्दीचा कायापालट केला गेला.
3. **आदर्श गाव हिवरे बाजार** : माननीय पोपटराव पवार यांच्या पुढाकाराने संपूर्ण गावाचा कायापालट आणि स्वयंपूर्ण गाव करण्यासाठी जलसंधारण, ठिबक सिंचन, पिण्याच्या पाण्याचे व्यवस्थापन , वृक्षसंवर्धन, श्रमदान योजना, दारूबंदी, कुटुंबनियोजन अशा योजना राबवून देशपातळीवर गावाचे नाव केले.

क्षेत्रफळाच्या दृष्टीने अहमदनगर जिल्हा महाराष्ट्रात प्रथम क्रमांकाचा आहे. जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ १७०४८ चौ. किमी आहे.

गोदावरी व भीमा जिल्ह्यातील प्रमुख नद्या आहेत. जिल्ह्याच्या उत्तर सीमेवरून गोदावरी नदी वाहते. प्रवरा व मुळा तिच्या उपनद्या आहेत. भीमा जिल्ह्याच्या दक्षिण सीमेवरून वाहते. दक्षिण भागातून सीना, हंगा, घोड या नद्या वाहतात. काळी लालसर, काळी बरड , व पांढरी या प्रकारात जिल्ह्याची जमीन विभागलेली आहे. काळी माती ही कोपरगाव, श्रीरामपूर, राहुरी मुख्यत्वे या भागात बहुतेक सर्व साखर कारखाने वसलेले आहेत.

जनगणना २०११ नुसार जिल्ह्यात १५८४ गावे, १४ तालुक्यात विखुरलेली आहेत. १४ पंचायत समित्या, १३११ ग्रामपंचायती, १ महानगरपालिका , ९ नगरपालिका , १ नगर पंचायत शिर्डी, व कटक मंडळ आहे जिल्ह्यात आहेत. ज्वारी हे जिल्ह्याचे मुख्य पीक, खरीप हंगामात बाजरी, भुईमुग, मठ, सोयाबीन, गहू, हरभरा, ही रब्बी हंगामात घेतली जातात. ऊस हे जिल्ह्याचे नगदी पिके आहे, आर्थिक विकासास हातभार लावला. गंगापूर, भंडारदरा, मुळा, घोड, कुकडी या धरणांमुळे बराचसा भाग ओलिताखाली आला आहे.

सन २०१५-१६ अखेर जिल्ह्यात ५२९५ सहकारी संस्था आहेत. जिल्ह्यात मार्च २०१६ अखेर १००% विद्युतीकरण झाले आहे. आरोग्यसेवेअंतर्गत सार्वजनिक व शासन सहाय्यित २६ रुग्णालये , २० दवाखाने, ९६ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ५५५ उपकेंद्रे आहेत. अहमदनगर येथे सप्टेंबर २०१६ अखेर ५०४६ प्राथमिक शाळा, ९५६ माध्यमिक शाळा, व १०८५ उच्च माध्यमिक शाळा जिल्ह्यात आहेत.

रेल्वेमार्ग, मध्यरेल्वे १९७ किमी लांबीचा मार्ग जिल्ह्यातून जातो. सर्व प्रकारच्या २२,१८६.८७ किमी लांबीच्या रस्त्यांनी जिल्ह्यातील १५८४ गावे जोडली गेली असून महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे प्रवाशी , वाहतुकीचे विस्तृत जाळे या जिल्ह्यात आहेत. एस.टी. मार्गाची एकूण लांबी ६०४७१ किमी असून एस. टी. महामंडळाच्या ८४१ बसेस जिल्ह्यात धावतात.

**धार्मिक वितरण:**

२०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील ९०.४% लोकसंख्या ही हिंदू असून , ७.१% लोकसंख्या मुस्लीम धर्माची आहे, तर ०.७% बौद्ध , ०.९% जैन, ०.५% ख्रिश्चन, ०.१ % शीख धर्मीय लोक राहतात.

**मातृभाषा:**

सन २०११ च्या जनगणनेनुसार ८८.३% लोकसंख्येची भाषा मराठी आहे. ग्रामीण भागात ९२.८%, लोकांद्वारे बोलली जाते, तर शहरात ७०.१% लोक मराठीतून बोलतात.

शहरी भागात ९.९% लोक हिंदी बोलतात, तर ग्रामीण भागात ३.३% लोक हिंदी बोलतात, तर ७.९% लोक उर्दू भाषा बोलली जाते, ती शहरात तर ग्रामीण भागात १.१ % लोक उर्दू बोलतात.

**अहमदनगर जिल्याचे नाव अहिल्यानगरच का?**

अहमदनगर जिल्ह्याचे नामांतर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नगर करावे अशी मागणी अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज भूषणसिंह राजे होळकर यांनी तत्कालीन मुख्य मंत्री उद्धव ठाकरे यांना पत्र लिहून कळविले होते, महाराष्ट्रात जन्माला येणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेविनी संपूर्ण हिंदुस्थानला नवीन दिशा दिली, देशाला अखंडित ठेवले, त्यांच्या महान स्मृतीपुढे नतमस्तक होऊन अहिल्यादेविंवर निष्ठा असणाऱ्यांच्या लोकभावनेचा सन्मान ठेवत अहमदनगर जिल्ह्याचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नगर अस नामांतर तातडीने करावे शेवटी आपण कोणत्या इतिहासाचा वारसा सांगणार? जुलमी राजवटीचा कि पुण्यश्लोक अहिल्यादेविंचा? त्यानंतर भाजपाचे आमदार गोविंद पडळकर यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे अशीच मागणी केली होती, लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर महायुती सरकारने मंत्रिमंडळ बैठकीत २८ महत्वाचे निर्णय घेतले त्यातला एक महत्वाचा निर्णय म्हणजे अहमदनगर शहराचे नाव पुण्यश्लोक अहिल्यानगर करण्यास मान्यता दिली.

अहिल्यादेवी होळकर याच्या २९८ व्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे चौंडी या गावी आले असता त्यांनी ही घोषणा केली होती. राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मगाव हे अहमदनगर जिल्यातील चौंडी हे आहे, त्यांचा जन्म मराठी हिंदू कुटुंबात झाला, माणकोजी शिंदे आणि सुशीला शिंदे हे त्यांचे आईवडील होत. त्यांचे लग्न इंदूरच्या होळकर परिवारात झाले, त्यांनी धार्मिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात मोठी कामगिरी केली होती. त्यांचे शासन सामाजिक कल्याण आणि मानवतावादी कार्यासाठी त्या देशभर प्रसिध्द झाले. पती खंडेराव होळकर व सासरे मल्हारराव होळकर

याच्या मृत्यनंतर अहिल्या बाई यांनी होळकर घराण्याचा कारभार हाती घेतलं. राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर म्हणजे अवघ्या हिंदुस्थानच्या प्रेरणास्थान आहेत, जेंव्हा मुघल, निजामशाहीत हिंदू संस्कृतीवर हल्ले होत होते, मंदिरे लुटली जात होती त्यावेळेस त्यांनी हिंदू संस्कृतीत प्राण फुंकले, त्यांचा जीर्णोद्धार केला , अनेक घात, बारव बांधले, स्त्रियांना सन्मान मिळून दिला, लोकहितासाठी कुशल प्रशासनाचा वस्तुपाठ त्यांनी घालून दिला. त्या इंदूरच्या मल्हारराव होळकर याच्या सून, मल्हार रावानंतर अहिल्यादेवी यांनी जवळपास २८ वर्षे माळवा राज्याच्या महाराणी म्हणून राज्य चालविले.

अहमदनगर शहराची स्थापना २८ मे १४९० रोजी मलिक अहमद बादशहा यांनी केली. अहमदनगर शहराच्या स्थापनेला ५३२ वर्षे पूर्ण झाली आहेत. यापूर्वी शिवसेनेकडून अहमदनगरचे नाव अंबिकानगर करावी अशी मागणी केली होती. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची १९९५ साली वाडिया पार्क येथे झालेल्या सभेत त्यांनी अहमदनगरचे नाव 'अंबिका नगर ' झाले असे जाहीर केले होते. शहरातील विशाल गणपती मंदिरात मिळालेल्या कागदपत्रात शहराचे नाव 'तळिये नगर' अस असल्याची नोंद सापडते. मनसेने देखील नगर शहरात रेणुका माता मंदिर अर्थात अंबिका मातेवरून शहराचे नाव असावे यासाठी मोठे आंदोलन केले होते.एम आय एम ने शाह शरीफ हे नाव सुचविले होते कारण छत्रपती शिवाजी महाराज आणि अहमदनगर यांचा ऋणानुबंध अत्यंत जुना आहे. त्याचे पूर्वज मालोजीराजे भोसले, शहाजीराजे भोसले, शरीफराजे भोसले यांची कारकीर्द याच शहरात बहरली.

अहमदनगर जिल्ह्याचे नाव 'अहिल्यानगर' असे करण्याची मागणी कित्येक दिवसापासून होत आलेली आहे. अहमदनगर शहराच्या नामांतराचा प्रस्ताव केंद्राकडे असतानाच, हा मुद्दा स्थानिक सामाजिक कार्यकर्ते यांनी न्यायालयात नेला, माजी कुलगुरू सर्जेराव निमसे, सामाजिक कार्यकर्ते अर्शद शेख आणि पुष्कर सोहोनी यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात नामान्तराविरोधात याचिका दाखल केली होती, यादरम्यान राज्य सरकारने या मागणीच्या प्रस्तावाला मंजुरी दिल्यानंतर अखेर केंद्र सरकारने देखील राज्य सरकारकडून पाठविण्यात आलेल्या प्रस्तावाला केंद्रीय मंत्री मंडळ बैठकीत मंजुरी दिली आहे. राज्याचे महसूल , पशुसंवर्धन आणि दुग्ध विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी 'अहिल्यानगर नामांतराची वचनपूर्ती' नगर जिल्याचे नामांतर अहिल्यानगर करण्याच्या प्रस्तावाला केंद्र सरकारने मंजुरी दिली.

अहमदनगरचे नामांतर अहिल्यानगर करण्यासाठी लागणाऱ्या सर्व कायदेशीर प्रक्रिया राज्य शासनाने पूर्ण केल्या आहेत,त्यानंतर ९ ऑक्टोबर २०२४ रोजी महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात त्यासंदर्भातील अधिसूचना प्रसिद्ध झाली आहे. अहमदनगर शहरासह जिल्ह्याचे आणि तालुक्याचे नाव अहिल्यानगर करण्यात आले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या जयंतीदिनास ३०० वर्षे पूर्ण होत असतानाच या निर्णयाची अंमलबजावणी झाली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की अहिल्यादेवीच नाव हिमालया एवढ असून आता या जिल्ह्याचा मान देखील हिमालया एवढा होणार आहे.

**समारोप:**

आज शहराचे नाव बदले मात्र येणाऱ्या वर्षात संस्कृती जतन करणे, पुढील पिढीला इतिहासाचे ज्ञान देणे, मानवता, सर्वधर्मसमभाव ही भावना रुजविणे अत्यंत आवश्यक आहे, आजच्या तरुण पिढीला योग्य शिक्षण, उत्तम रोजगाराचे साधन मिळायला हवे, संपूर्ण कुटुंबाचा विकास होणे अपेक्षित आहे, सरकारने भविष्यकालीन गरजा लक्षात घेऊन या शहराचा विकास करायला हवा, औद्योगिकीकरण वेगात यायला हवे, नैसर्गिक बाबींचे संधारण करायला हवे, उत्तम आरोग्यसेवा, संस्कृती संवर्धन करणारे नागरिक निर्माण करायला हवेत, जाती पातीचे, धर्माचे राजकारण होता कामा नये, राष्ट्रासाठी उत्तम व सुजाण नागरिक निर्माण करण्यासाठी योग्य शिक्षण सुविधा देणे गरजेचे आहे, राजकारणी व्यक्तींनी आपल्या घराचा नाहीतर समाजाचा सर्वांगीण विकास करण्यावर भर दिला तर नक्कीच सर्वांमध्ये एकात्मतेची भावना वाढीस लागेल.

**संदर्भ :**


1. लोकमत फेब्रुवारी २०२१
2. सुनील भोंगळ, ABP माझा अहमदनगर २८ जुलै २०२२.
3. न्यूज लोकमत,३१मे २०२३
4. ahmednagar.nic.in
5. रोहित कणसे, इ-सकाळ ४ ऑक्टोबर २०२४
6. जितेंद्र झवर tv9 मराठी ९ ऑक्टोबर २०२४

7. अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - २०१६.
8. www.sarda.co.in
9. www.wikipedia.org/wiki/Ahmednagar
10. discovermh.com